# प्रकटन

श्री. जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, या न्यासाच्या विश्वस्तांचा कार्यकाल दि. २४ नोव्हेंबर २०१९ रोजी संपतो आहे. न्यासाचे १० विश्वस्तांकरिता, निस्वार्थ व मनोभावे सेवा देऊ इच्छिणाऱ्या मोहटे गावातील पाच व मोहटे गावा व्यतिरिक्त भाविकांमधून पाच विश्वस्तांची नेमणुक पुढील तीन वर्षाच्या कालावधीकरिता करणेकामी याद्वारे बंद लिफाफ्यामध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत. याकरिता सदर न्यासाच्या योजनेतील कलम ९ कडे इच्छूक अर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

**कलम ९) विश्वस्तांची अपात्रता :-**

*(अ) जी व्यक्ति भारतीय नागरिक नाही.*

*(ब) जी व्यक्ति धर्माने हिंदू नाही.*

*(क) जी व्यक्ति कर्ज न फेडलेली दिवाळखोर आहे.*

*(ड) ज्या व्यक्तिचे वय २१ वर्षापेक्षा कमी आहे.*

*(इ) जी व्यक्ति असे हित जोपासत आहे, की जे सदर न्यासास प्रतिकूल आहे.*

*(फ) जी व्यक्ति मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० मधील तरतूदीनुसार अपात्र आहे.*

सदरहू अर्ज, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. जगदंबा देवी सार्वजनिक न्यास, मोहटे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर यांचे कार्यालयात प्रकटन जाहीर झाल्यापासून समक्ष किंवा पोस्टाद्वारे दि. ०७/०९/२०१९ चे सायंकाळचे ०६-०० वा. पर्यंत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अर्जातील माहिती अपुर्ण, खोटी आढळून आल्यास सदरील अर्जदार अपात्र ठरविण्यात येतील व त्यांचे नामांकन विचारात घेतले जाणार नाही. सदरचे प्रकटन www.shrimohatadevi.org या संकेतस्थळावर पाहण्यास मिळेल.

**अर्जदाराने अर्जावर स्वतःचा नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा. पुढील बाबी कागदपत्रांसह अर्जामध्ये नमूद असणे आवश्यक आहे.**

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव,

२) अर्जदार, न्यासाचे योजनेच्या कलम ९ प्रमाणे अपात्र नसलेबाबत नोटरी पब्लिक किंवा सक्षम प्राधिका-यासमक्ष साक्षांकित केलेले शपथपत्र (मूळ),

३) पत्ता (रहिवास पुराव्यासह), जन्मतारीख (२१ वर्षाहून जास्त वय असल्याच्या पुराव्यासह), शैक्षणिक माहिती (प्रमाणपत्रासह), व्यवसाय (कागदपत्रांसह),

४) विश्वस्त पदाचा अनुभव (असल्यास) व इतर अनुभव (प्रमाणपत्रासह),

५) वार्षिक उत्पन्न,

६) भ्रमणध्वनी /दूरध्वनी क्रमांक.

अर्जदाराने वरील माहिती आपले अर्जात संगणकावर टंकलिखित करुन किंवा स्पष्ट आणि सुवाच्च हस्ताक्षरात नमूद करावी. तसेच अर्जासोबत सादर केलेले सर्व कागदपत्र शपथपत्र वगळता स्वसाक्षांकित करावीत.

तसेच दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले चारित्र्याचे दाखले व अर्जदारावर फौजदारी गुन्हा पूर्वी अथवा सध्या दाखल नसल्याबाबत अर्जदाराने स्वतःचे सक्षम प्राधिकाऱ्यासमोर केलेले शपथपत्र सोबत जोडावे.

अर्जासोबत अर्जदाराने स्वतःचे नांव व संपुर्ण पत्ता असलेले रजिस्टर्ड पोस्ट पोहच पावतीसाठीची आवश्यक असलेली तिकीटे लावलेला लिफाफा पोहच पावतीसह जोडावा.

अर्जदाराने अर्ज सीलबंद लिफाफ्यात सादर करावा. लिफाफ्यावर ठळक अक्षरात ''**विश्वस्त पदासाठी अर्ज**'' असा उल्लेख करावा.

(श्रीकांत ल. आणेकर)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,अहमदनगर

अहमदनगर
दिनांक- २८ ऑगस्ट २०१९.